सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. ०७ मार्च २०१८

## बृहन्मुंबईसह ७ महानगरपालिकांतील रिक्तपदांसाठी ६ एप्रिलला मतदान

मुंबई, दि. ७: बृहन्मुंबई, नाशिक, सोलापूर, जळगाव, पुणे, अहमदनगर व उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रत्येकी एका रिक्तपदांच्या पोटनिवडणुकीसाठी ६ एप्रिलला मतदान; तर ७ एप्रिल २०१८ रोजी मतमोजणी होणार आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, नामनिर्देशनपत्रे १३ ते २० मार्च २०१८ या कालावधीत दाखल करता येतील. १८ मार्च २०१८ रोजी शासकीय सुट्टीमुळे नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत. २१ मार्च २०१८ रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी होईल. नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याची अंतिम मुदत २३ मार्च २०१८ पर्यंत असेल. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना २४ मार्च २०१८ रोजी निवडणूक चिन्हे नेमून देण्यात येतील. ६ एप्रिल २०१८ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. मतमोजणी ७ एप्रिल २०१८ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.

**पोटनिवडणुका होणारे महानगरपालिकानिहाय प्रभाग: बृहन्मुंबई-** १७३, **नाशिक-** १३-क, **सोलापूर-** १४-क, **जळगाव-** २६-ब, **पुणे-** २२-क, **अहमदनगर-** ३२-ब आणि **उल्हासनगर-** १७-ब.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)